दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २६६ वा शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# सहकारातील दीपस्तंभ

१८ एप्रिल २०२५ हे सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख यांचे अमृतमहोत्सवी वर्ष. प्रथम त्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करतो आणि त्यांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना करतो. मा. दिलीपरावजी देशमुख म्हणजे विलक्षण प्रतिभा लाभलेले व्यक्तिमत्त्व. राजकारणात स्वत:ला पुढे रेटण्याचा स्वभाव नसल्यामुळे ते जास्त प्रकाश झोतात राहिले नाहीत. पण काहीशा आक्रमक कार्यशैलीमुळे त्यांनी आपल्या कार्याची मुद्रा विविध क्षेत्रांवर ठळकपणे उमटविली आहे. त्यांची कार्यशैली आक्रमक असली तरी त्यांनी तिचा दर्जा कधीही खाली येऊ दिला नाही. याचं कारण म्हणजे ते सातत्याने मा. शिवराज पाटील चाकुरकर आणि कै. विलासरावजी देशमुख यांच्या सहवासात राहिले.

मा. दिलीपरावजी देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वात शिवराज पाटील चाकुरकर यांची वैचारिक बैठक, शिस्त, नेमकेपणा, प्रसंगी कठोरता तर कै. विलासरावजी देशमुख यांची सहजता, सर्वसमावेशकता, राजकीय निपुणता, व कणखरपणा दिसून येतो. ह्या दोन मोठ्या व्यक्तिमत्त्वांच्या गुणांचा समुच्चय असलेले दिलीपरावजींचे व्यक्तित्व आहे.

बहुमुखी प्रतिभेचे धनी असलेल्या दिलीपरावजींनी समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शेती, सहकार, शिक्षण, कला-क्रीडा आदी क्षेत्रांत आपले कर्तब दाखविले असले तरी या सर्वांत सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य उठावदार राहिले आहे. म्हणून ते सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ ठरतात!

मा. दिलीपरावजी देशमुख यांनी स्वच्छ व पारदर्शक कारभार आणि शिस्तीच्या माध्यमातून आपला वेगळा दरारा निर्माण केला आहे. ज्या-ज्या संस्थांमध्ये त्यांनी काम केले आहे तिथे आपल्या कार्याची अमीट छाप उमटविली आहे. नव्वदच्या दशकात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करताना २८ व्या क्रमांकावरील लातूर जिल्हा परिषद थेट पहिल्या क्रमांकावर आणण्याचे कार्य त्यांनी केले. जिल्हा परिषदेचा समृद्ध वारसा दिलीपरावजीनंतर पुढे कोणास तेवढ्या ताकदीने पेलता आलेला नाही, हे वास्तव आहे.

३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर जिल्ह्यावर निसर्गाची अवकृपा झाली. किल्लारी परिसरात प्रलयंकारी भूकंप झाला. जिल्हा परिषद अध्यक्ष या नात्याने मा. दिलीपरावजी देशमुख यांनी आपली सर्व प्रशासकीय कौशल्य पणाला लावून पीडित लोकांना सर्वतोपरी प्राथमिक मदत पोहचविण्याचे अद्वितीय कार्य केले. पुढे कॅबिनेटमंत्री बनल्यानंतर भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्र आरक्षण देण्याचा मुद्दा त्यांनी विधिमंडळात लावून धरला आणि स्वतंत्र २ टक्के आरक्षण मिळविले. त्याचा आजवर हजारो विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे.

मा. दिलीपरावजी देशमुख हे कुशल प्रशासक आणि अत्यंत दूरदृष्टी असलेलले नेते आहेत. कोणतेही काम वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने झाले पाहिजे हा त्यांचा आग्रह लातूरच्या विकासासाठी पूरक ठरला आहे. कामातील सुसूत्रीपणा हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अर्थ व नियोजन खात्याचे राज्यमंत्री बनल्यानंतर त्यांच्या नियोजन कौशल्याचा खरा आविष्कार महाराष्ट्राला पाहिला मिळाला. तत्कालीन अर्थमंत्री जयंतराव पाटील यांच्या सोबत त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा 'सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प' म्हणून ओळखला गेला.

एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ हे बोध वाक्य महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पारदर्शक व विश्वासार्ह अर्थव्यवस्थेच्या माध्यमून मा. दिलीपरावजी देशमुख यांनी लातूर जिल्ह्यातील सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविल्या. लोककल्याणाच्या स्वच्छ भावनेतून शेतकर्यांचे कल्याण व्हावे या उदात्त हेतूने त्यांनी मांजरा परिवारातील साखर कारखाने आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चालविली.

मा. दिलीपरावजी देशमुख यांच्या कुशल नेतृत्वाखाली सर्वच सहकारी संस्थांनी देशपातळीवर आपल्या यशाचा आलेख सातत्याने चढता ठेवला आहे. सहकार क्षेत्रातील पथदर्शी अग्रदूत म्हणून दिलीपरावजींनी लोकमान्यता मिळवलेली आहे. सत्ता, अधिकार, सन्मान ज्या सामान्य शेतकर्यांच्या प्रामाणिक कष्टातून प्राप्त होतात त्याबद्दलची प्रांजळ कृतज्ञता दिलीपरावजी सतत व्यक्त करतात. अशी कृतज्ञतेची जाणीव मनात ठेवून सहकार क्षेत्रात काम करणारे अभावानेच दिसतात.



खरं तर सहकारात राहून 'पॉप्यूलर' बनण हे मृगजळासारखे आहे. वाढत्या अपेक्षांच्या या काळात अपेक्षापूर्ती करणं हे 'पॉप्युलर' नेतृत्वाची पूर्वअट बनलेली आहे. सर्वसामान्य जनतेची मेंटल पॅथॉलॉजी दिलीपरावजींना समजलेली असल्यामुळेच अपेक्षापूर्ती आणि पॉप्युलॅरिटी यांचा समतोल राखत त्यांनी आपले 'स्व'त्व जपले आहे.

चौफेर ज्ञान आणि प्रचुर प्रमाणात प्रशासकीय कौशल्य या दोन्ही बाबतीत प्रचंड हुकुमत असलेलं बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे मा. दिलीपरावजी देशमुख होय. शेतकरी हिताच्या ध्येयाने झपाटलेल्या एका थोर व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाने लातूरच्या सहकाराचं सोनं ज्यांनी केलं, चंदनाप्रमाणे स्वत: झिजून इतरांना सुगंध दिला तसेच सहकार क्षेत्रात लातूरचे नाव देशपातळीवर पोहोचविले असे मा. दिलीपरावजी देशमुख हे मराठवाड्याची खर्या अर्थाने अस्मिता आहेत.

'सहकारातील दीपस्तंभ' या शब्दांची खरी प्रचिती आजच्या दिवसात अनुभवायची असेल तर फक्त सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख या व्यक्तिमत्त्वात. एक कुशल प्रशासक आणि जिंदादील माणूस म्हणून साहेबांचे व्यक्तिमत्त्व आदर्शच म्हणावे लागेल! पु. लं.च्या शब्दात सांगायचे झाले तर सध्या पायावर डोके ठेवावे असे पायच दुर्मिळ झाले आहेत. पण आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेबांच्या रूपात ते अस्तित्वात आहेत, ही प्रचिती झाल्याशिवाय राहत नाही.

काय वाणू आता, न पुरे ही वाणी।
मस्तक चरणी ठेवीतसे।।

संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळीप्रमाणे साहेबांबद्दल व्यक्त होताना माझ्यासारख्या नवख्या लेखकाची अशी अवस्था होणे साहजिक आहे. समाजकार्याच्या रूपाने आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेबांनी सहकार, शेती, समाजकारण, राजकारण आदि क्षेत्रांसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचे वर्णन शब्दात करणं तसं कठीणच आहे. त्यांचा सहवास, त्यांच्यासोबतचे अनुभव या संदर्भातील माझ्या तोकड़या शब्दातून अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्यच आहे.

आजचा दिवस हा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला सलाम करण्याचा आणि त्यांच्यावर मनापासून प्रेमाचा वर्षाव करण्याचा सुवर्णदिवस आहे. साहेबांना अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने मी हार्दिक शिवशुभेच्छा देऊन त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करतो. धन्यवाद!

**विद्याधर कांदेपाटील**
**(लेखक व सामाजिक कार्यकर्ता)**






## संपादकीय

### आयीं हवा निकल जायेंगी।

दि. २५ मे २०२५ हा दिवस भारतातील तमाम ध्येयवेड्या तरुण-तरुणींसाठी अत्यंत महत्त्वाचा. आयएएस, आयपीएस, आयएफएस बनण्यासाठी ज्या परीक्षेची तरुण, तरुणी गेल्या दीड-दोन वर्षांपासून वाट पाहत आहेत, ती यूपीएससी पूर्व परीक्षा फक्त एक महिना सात दिवसांवर आहे. २५ मे रोजी रविवारी देशातील सुमारे १३ लाख विद्यार्थी मुख्य परीक्षेला पात्र होण्यासाठी कर्तुत्व आजमावतील. यातील निम्मे यशवंत ऑगस्टमध्ये होणार्या मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरतील.

भारतातील तरुण, तरुणींची जसजशी संख्या वाढतेय तसतशी आयएएस आणि आयपीएस बनण्याची क्रेझही वाढतेय. तथापि, असे सर्वच ध्येयवादी तरुण-तरुणी आयएएस, आयपीएस अधिकारी बनू शकत नाहीत. वर्षभरातील एकूण जागा मर्यादित आणि इच्छुक जास्त असे व्यस्त प्रमाण असल्याने कित्येक उमेदवारांना आयआरएससह (भारतीय महसूल सेवा) अन्य २६ ते २७ सेवांमध्ये समाधान मानावे लागते. गुणवत्ता यादीत झळकणारे पहिले शंभर ते सव्वाशे उमेदवारच आयएएस, त्यानंतर दुसर्या श्रेणीतील १०० आयएफएस आणि तिसर्या श्रेणीतील १०० ते १२५ आयपीएस बनू शकतात. उरलेल्या ५०० ते ६०० उमेदवारांना इंडियन पोस्टल सर्व्हिस, इंडियन कोस्टल सर्व्हिस, सीबीआय सुपरिंटेंडेड यासह अन्य अखिल भारतीय सेवांमधील पदांवर समाधान मानावे लागते. आयएएस ही देशातील सलग दोन वर्षे चालणारी अशी परीक्षा आहे, जी केवळ पास होऊन चालत नाही. येथे मेरिटमध्येच यावे लागते. या परीक्षेला बसणारे सर्वच उमेदवार अभ्यास करतात; पण इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी उत्तुंग यश मिळवावे लागते. असे उत्तुंग यश मिळविण्यासाठी अभ्यासही खडतर करावा लागतो. अशा अभ्यासासाठी परिश्रमही कठोर असायला हवेत.

विजय मिळो अथवा पराजय, याची पर्वा न करता प्रचंड शक्तिनिशी ते कामाला लागतात आणि अखेर यशाला गवसणी घालतातच. महाराष्ट्रात असे अनेक उमेदवार होऊन गेले आहेत, ज्यांनी परीक्षा देण्याचे शेवटचे वर्ष आणि अखेरचा प्रयत्न (अटेम्ट) शिल्लक असताना आयएएस परीक्षा क्रॅक केली आणि कुटुंबीयांना सुखद धक्का दिला. सनदी अधिकारी बनण्याचे वेड तरुणांना का खुणावते? जगात मंदीची लाट येवो की कोरोनाची महामारी, सनदी अधिकार्यांचे पगार कधीच कुणीही थांबवू शकत नाही. भारतीय राज्यघटनेने या नोकरशहांना भक्कम संरक्षण कवच बहाल केले आहे. त्यांचा पगार दर महिन्याच्या १ तारखेला होतोच. त्यांचा पगार संचित निधीतून केला जातो. एखादा सनदी अधिकारी कुणाला आवडो अथवा न आवडो, त्याला वाट्टेल तेव्हा नोकरीवरून काढता येत नाही.

अखिल भारतीय सेवेच्या ३११ व्या कलमाने त्यांच्या नोकरीला भक्कम संरक्षण कवच लाभले आहे. यामागचा मुख्य हेतू हाच की, सरकार कोणत्याही पक्षाचे असूदेत सनदी अधिकार्यांनी निष्पक्ष आणि तटस्थ राहून निर्भयपणे काम करावे; परंतु बरेच सनदी अधिकारी निर्भयपणे काम न करता राजकारण्यांची खूशमस्करी करण्यात धन्यता मानतात. त्याचे कारणही दिवसेंदिवस ओंगळवाणे आणि हिडीस रूप धारण करत असलेल्या राजकारणात आहे. गुजरातमधील संजय भटसारख्या आयपीएस अधिकार्यासारखी आपली गत होऊ नये आणि आयुष्यभर तुरुंगात सडण्याची वेळ येऊ नये, असे बर्याच सनदी अधिकार्यांना वाटू शकते; पण धोरणी मुत्सद्दीपणा आणि निष्कलंक चारित्र्य असेल, तर राजकारण्यांच्या मुसक्या आवळता येतात, हे भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी दाखवून दिले आहे. आपल्या शक्तीचे सिंचन केल्याने देशात किती आमूलाग्र बदल केला जाऊ शकतो याचा वस्तुपाठ शेषन यांनी घालून दिला आहे. देश तोच आहे. राजकारणी आणि परिस्थिती फक्त बदलली.

# उदंड झाल्या सुट्ट्या

सरकारी सुट्ट्या हा कोणत्याही देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रशासकीय व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग असतो. भारत हा सुट्ट्यांचा देश आहे, असं अनेकदा उपहासानंही म्हटलं जातं. भारतीय लोक उत्सवप्रिय असल्याने अनेक सण साजरे करीत असतात. त्या सणांना सरकारी सुट्ट्या न दिल्यास सणप्रिय लोक नाराज होतात. म्हणून जवळपास सगळ्या महत्त्वाच्या सणांना सरकार सुट्ट्या देत असते. आज जमाना बदलला आहे आणि जगण्याचे सारे संदर्भ बदलले आहेत. या बदलत्या काळात बरेच सण हे औपचारिकता राहिले आहेत. कित्येक जण ते सण साजरेही करत नाहीत; पण त्यानिमित्तानं सुट्टी मात्र दिली जाते. भारतात अनेक धर्मांचे लोक राहात असल्याने अशा सणांची आणि सुट्ट्यांची संख्या मोठी झाली आहे. सरकार दरवर्षी सुट्ट्यांची यादी प्रसिद्ध करते. यामध्ये तीन राष्ट्रीय सुट्ट्या (प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन आणि गांधी जयंती) अनिवार्य असतात. याखेरीज केंद्र आणि राज्य शासनांच्या स्तरावर विविध सण, धार्मिक आणि प्रादेशिक दिवसांना सार्वजनिक सुट्ट्या दिल्या जातात.

चालू महिन्यामध्ये म्हणजे एप्रिल २०२५ मध्ये सरकारी सुट्ट्यांची संख्याच इतकी अधिक आहे की, यामुळे बँका, सरकारी कार्यालये बंद राहिल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अर्थात, हे यावर्षी झाले आहे असे नाही. विविध सण, राष्ट्रीय दिवस, धार्मिक उत्सव आणि रविवार यांच्या एकत्रित संयोगाने या महिन्यात उद्योग, सेवा आणि वित्त क्षेत्रांमध्ये कामकाजाची घडीच विस्कटते. सुट्ट्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व मान्य करतानाच बदलत्या काळात त्यांचा अर्थकारणावर होणारा प्रभावदेखील तपासणे गरजेचे आहे, असा एक मतप्रवाह सध्या पुढे येत आहे.



सुट्ट्या ही एक गरज मानली जाते. मात्र, ज्या वेळी सुट्ट्यांची संख्या आणि कालावधींचा अतिरेक होत जातो, तेव्हा अर्थव्यवस्थेच्या चाकांना ब्रेक लागल्यासारखी स्थिती निर्माण होते. या महिन्यात एकूण १० पेक्षा जास्त दिवस बँका, शासकीय कार्यालये, उद्योग आणि शाळा बंद राहणार आहेत. १५ एप्रिलला बंगाली नववर्ष दिन, हिमाचल दिन, बोहाग बिहू यामुळे निवडक राज्यांमध्ये बँका बंद राहतील. १६ एप्रिलला आसामी नववर्षानिमित्त गुवाहाटीमध्ये बँकांना सुट्टी आहे. २१ एप्रिल रोजी गरिया पूजेमुळे त्रिपुरात आगरतळामध्ये बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. २९ एप्रिल रोजी श्री परशुराम जयंतीनिमित्त शिमल्यामध्ये बँक हॉलिडे असणार आहे. ३० एप्रिल रोजी बसवेश्वर जयंतीनिमित्त बंगळुरूमध्ये बँका बंद राहतील.

लागोपाठ येणार्या या सुट्ट्यांमुळे बँकिंग व्यवहार, सरकारी निर्णय प्रक्रियेला विलंब होणार आहे. मोठे आर्थिक व्यवहार, कर्ज प्रक्रिया, सरकारी अनुदानाचे वितरण आणि करसंकलन यावर याचा थेट परिणाम होईल. तसेच, शेअर बाजारही काही दिवस बंद राहिल्याने गुंतवणूकदारांच्या हालचाली मर्यादित होणार आहेत. लघुउद्योग आणि व्यापार्यांचे नियमित उत्पन्न चक्र, उत्पादन क्षेत्र, वाहतूक सेवा आणि रोजंदारीवर चालणार्या कामगारांवर याचा मोठा आर्थिक परिणाम होतो. कारण अशा उद्योगांसाठी सातत्य महत्त्वाचे असते. कारण प्रत्येक सुट्टीनंतर 'वर्क बॅकलॉग' निर्माण होतो, जो कार्यक्षमतेवर परिणाम करतो.

सार्वजनिक सुट्ट्यांबाबत जगभरातील इतर देशांशी तुलना करावयाची झाल्यास जपानमध्ये वार्षिक सरकारी सुट्ट्यांची सरासरी १६ दिवस इतकी आहे. अमेरिकेत हे प्रमाण ११ दिवस असे आहे. तेथे सर्वच सुट्ट्या अनिवार्य नाहीत. फ्रान्समध्येही ११ दिवस राष्ट्रीय सुट्ट्या आहेत. यावरून भारतात सरकारी सुट्ट्यांची संख्या इतर अनेक देशांच्या तुलनेत जास्त असल्याचे लक्षात येते. भारतात धार्मिक, प्रादेशिक विविधतेमुळे सुट्ट्यांचे विभाजन असंख्य गटांमध्ये होते. यामुळे कामकाजाच्या दिवशी विविध ठिकाणी ङ्गरक जाणवतो. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुट्टी मिळते, तर तामिळनाडूमध्ये पोंगल किंवा केरळमध्ये ओणमला. या स्थानिक सणांमुळे बँकिंग, प्रशासकीय, शैक्षणिक आणि उद्योग व्यवहारांमध्ये असमतोल निर्माण होतो.

गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक प्रवाहांच्या अनुकरणार्थ पाच दिवसांचा आठवडा ही नवी संकल्पना उदयास आली आहे. वर्षाच्या ३६५ दिवसांमध्ये जवळपास १५० हून अधिक दिवस सुट्ट्यांचेच असतील तर असा देश प्रगती कशी करणार, असा प्रश्न उपस्थित केला जातो. सुट्ट्यांची आवश्यकता नाकारता येणार नाही, मात्र त्याचे नियोजन शास्त्रशुद्ध पद्धतीने केले पाहिजे. एकाच महिन्यात इतक्या सुट्ट्या न देता, त्या विभागून दिल्यास आर्थिक चक्र अबाधित राहू शकते. तसेच, बँकिंगसारख्या काही सरकारी सेवांसाठी पर्यायी व्यवस्था तयार केल्यास कामकाज सुरळीत राहू शकते.

एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार जगात सर्वात जास्त सार्वजनिक सुट्ट्या भारतात असतात. पोर्तुगाल सरकारने मागील काळात आपला खर्च कमी करण्यासाठी आणि उत्पन्न वाढवण्यासाठी १४ सरकारी सुट्ट्यांची संख्या कमी करत १० वर आणली होती. ग्रेट ब्रिटनमधील एका सर्वेक्षणानुसार तिथे प्रत्येक सुट्टीमुळे बँकांना २३० कोटी पाउंड म्हणजेच, २० हजार कोटी रुपयांचे नुकसान होते. एका अभ्यासानुसार असे सांगण्यात आले की, बँकांना सुट्टी नसेल, तर ग्रेट ब्रिटनचा विकास १.३ टक्के इतका वाढू शकतो. हाच निकष कमी-अधिक ङ्गरकाने भारतासही लागू होतो.

आज नागरी समस्यांचा डोलारा इतका प्रचंड वाढलेला असताना आणि सरकारी कामांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवून सर्वसामान्य माणूस मेटाकुटीला आलेला असताना इतक्या सुट्ट्या दिल्या जाणार असतील तर सामान्यांचा त्रागा वाढणं स्वाभाविक आहे. सरकारी कर्मचार्यांना सुट्टी देताना त्यांचा पगार मात्र कायम राहतो आणि तो जनतेच्या कररूपी पैशातून दिला जातो. आज सरकारी कार्यालयांमधील किंवा बँकांमधील एका कर्मचार्याचे दिवसाचे वेतन हे किमान २००० रुपये इतके आहे. यावरून सुट्ट्यांमुळे सामान्यांचे किती पैशांचे नुकसान झालं असेल याचा अंदाज येईल. यामुळे सामान्य माणूस नाराजीपूर्वक प्रश्न उपस्थित करत असेल तर त्याला चुकीचे ठरवता येणार नाही.

प्रत्येकाला आपापल्या क्षेत्रात अत्युच्च आणि अत्युत्तम योगदान देण्यासाठी कार्यप्रवण केलं तर त्यातून देशाच्या प्रगतीला, विकासाला हातभार लागेल आणि सबंध समाजाचं हित साधलं जाईल. पण आधुनिकतेचा उद्घोष जितक्या जोमानं केला जातो तितक्या गांभीर्यानं कृती केली जात नाही, ही आपली खरी शोकांतिका आहे. समाजात महान व्यक्तिमत्त्वं म्हणून ज्यांना अधिमान्यता मिळते त्यांनी अत्यंत कष्टातून, संघर्षातून वाटचाल केलेली असते. या परिश्रमांच्या जोरावरच त्यांना शून्यातून विश्वनिर्मिती करता येणं शक्य होतं आणि म्हणूनच समाज त्यांच्याकडे आदर्श म्हणून पाहतो.

या प्रत्येक महापुरुषानं समाजाप्रतीचं आपलं दायित्व म्हणून भरभरून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यामागचा उद्देश इतकाच की आपल्या योगदानानं सामान्यांचं जगणं सुखकर व्हावं. अशा व्यक्तिमत्त्वांचे आदर्श घेऊन वाटचाल करताना कार्यमग्नतेला अनुरूप रचना असायला हवी. कारण अशी कार्यसंस्कृती, श्रमसंस्कृतीच देशाचं उज्ज्वल भवितव्य घडवेल.

# एमएसएमई पुढील आव्हाने

मध्यम उद्योग आता लघुउद्योग गटात, तर लहान कंपन्या आता सूक्ष्म उद्योग गटात गेल्या आहेत. त्यामुळे पूर्वी ज्या मध्यम गटात होत्या, त्या कंपन्या लघुउद्योगांना मिळणारे लाभ लाटतील.

केंद्र सरकारने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वर्गीकरणाचे निषेध बदलले अथवा सुधारित केले असून, त्यामुळे सूक्ष्म आणि लहान उद्योगांना फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केंद्र सरकारला या बाबीचा निश्चितपणे विचार करावा लागेल. कारण हे क्षेत्र म्हणजे अर्थव्यवस्थेचा कणा आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारीला सादर केलेल्या अर्थसंकल्पात हे बदल केले आहेत. त्यानुसार, या तिन्हीही गटांतील गुंतवणुकीच्या अडीच पटींनी आणि उलाढालीच्या मर्यादेत दोन पटींनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे ज्या कंपन्या पूर्वी मध्यम उद्योग गटात होत्या, त्या आता लघुउद्योग गटात आल्या आहेत. तर काही लहान कंपन्या आता सूक्ष्म उद्योग गटात गेल्या आहेत. त्यामुळे पूर्वी ज्या मध्यम गटात होत्या, त्या कंपन्या लघुउद्योगांना मिळणारे लाभ लाटतील, अशी भीती 'लघुउद्योग भारती' या संघटनेने एमएसएमई मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.




भारतात सूक्ष्म आणि लघुउद्योगांना बँकांकडून अग्रक्रम क्षेत्रातील पतपुरवठ्याचा फायदा मिळतो. त्यावर सवलतीच्या दरातील व्याज आकारले जाते. तसेच या दोन्ही गटांतील उद्योगांकडून सरकार २५ टक्के मालाची खरेदी करते. म्हणजे देशभरातील सरकारी संस्था जी वेगवेगळ्या मालाची खरेदी करतात, त्यातील २५ टक्के आरक्षण हे या क्षेत्रासाठी असते. एमएसएमई क्षेत्रातील ९९.९ टक्के हिस्सा हा सूक्ष्म आणि लघुउद्योगांचा आहे. उलट मध्यम उद्योगांचा त्यातील वाटा हा ०.०१ टक्कादेखील नाही. तरीसुद्धा हे मोजके मध्यमउद्योग सूक्ष्म व लघुउद्योग क्षेत्राच्या सवलतींवर आपला दावा करतील आणि हे अन्यायकारक आहे, अशी भावना आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वीची स्थिती वेगळी होती. ज्या उद्योगात एक कोटी रुपये गुंतवणूक असून, वार्षिक उलाढाल पाच कोटी रुपये आहे, ते मायक्रो किंवा सूक्ष्म उद्योगात गणले जात होते. लघुउद्योगांची हीच मर्यादा दहा कोटी रुपये गुंतवणूक आणि ५० कोटी रुपये वार्षिक उलाढाल, अशी होती. तर मध्यम उद्योगात ५० कोटी रुपये गुंतवणूक आणि अडीचशे कोटी रुपयांची उलाढाल अशी मर्यादा होती. एमएसएमई क्षेत्राचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यामधून अधिकाधिक तरुणांना रोजगार मिळावा, म्हणून या मर्यादा वाढवली आहे. त्याद्वारे त्यांची उत्पादनक्षमता वाढेल, तंत्रज्ञानात सुधारणा होईल आणि त्यांना अधिक भांडवल मिळेल, अशी आशा सीतारामन यांनी ही घोषणा करताना व्यक्त केली होती.

या सर्व प्रश्नाला दुसरीदेखील एक बाजू आहे. भारतात मध्यम आकाराच्या कंपन्या कमी आहेत. कारण सरकारी सवलती मिळत राहाव्यात, म्हणून उद्योजक सूक्ष्म किंवा लघु गटांत राहण्याचा प्रयत्न करतात. एकच कंपनी वाढवण्याऐवजी ते अनेक छोट्या छोट्या कंपन्या स्थापन करून, 'मर्यादेत' राहणे पसंत करतात. त्यामुळे सरकारी सवलती प्राप्त होत राहतात. मात्र, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादनाचे फायदे मिळत नाहीत. याचे कारण 'स्केल'चा उपयोग होत नाही, ही सरकारची भूमिका आहे. आता या दोन्ही बाजूंचा सरकारला साकल्याने विचार करून धोरण पुढे रेटावे लागेल.

भारतातील एमएसएमई क्षेत्रात ६ कोटी ३० लाख उद्योग आहेत. देशाच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ३० टक्के उत्पादन हे या क्षेत्रात होते. केवळ कारखानदारी क्षेत्र घेतले, तर त्यातील ४५ टक्के भाग हा एमएसएमईचा असतो आणि देशाच्या निर्यातीत ४० टक्के वाटा हे क्षेत्र उचलते. केंद्र सरकारच्याच आकडेवारीनुसार, ११ कोटी ३० लाख लोकांना रोजगार याच क्षेत्राने पुरवला आहे. नोटाबंदी, जीएसटीच्या अंमलबजावणीतील गोंधळ आणि करोनामुळे तसेच रशिया-युक्रेन युद्धाच्या परिणामी आणि नंतर गाझा पट्टीतील संघर्षामुळे, एमएसएमईला फटका देखील बसला. करोना महामारीच्या काळात हजारो एमएसएमई कारखाने बंद पडले. त्यात कच्च्या मालाच्याही किमती वाढल्यामुळे, संकटात भरच पडली. आता देशाची अर्थव्यवस्था करोनाच्या संकटातून कधीच बाहेर पडली आहे.

इतर देशांच्या तुलनेत आपण बर्या वेगाने प्रगती करत आहोत; परंतु तरीदेखील एमएसएमई क्षेत्राचे प्रश्न तातडीने सोडवण्याची गरज आहे. कर्जावरील चढे व्याजदर, अपुर्या पायाभूत सोयी, बाजारपेठेची माहिती न मिळणे, कुशल मजूर आणि तंत्रज्ञानाचा अभाव, कच्च्या मालाच्या भडकलेल्या किमती, हे एमएसएमई क्षेत्रातील महत्त्वाचे प्रश्न आहेत. या उद्योगांना गरज आहे, ती बाजारपेठ, पतपुरवठा, निर्यात, नेटवर्किंग याबद्दलच्या मार्गदर्शनाची. तसेच उत्पादनघटकांची वाजवी किमतीत कोठून आयात करता येईल, कोणत्या देशात निर्यातीस वाव आहे, याविषयीच्या माहितीचीही त्यांना गरज आहे.

येत्या पाच वर्षांत प्रत्येक राज्याने ३ लाख उद्योजक आणि १२ लाख रोजगार निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले, तर त्याचा देशाच्या विकासास लक्षणीय लाभ होईल, असे प्रतिपादन मायक्रोसॉफ्ट इंडियाचे माजी अध्यक्ष आणि ग्लोबल अलायन्स फॉर मास आंत्रप्रिन्युरशिपचे संस्थापक रवी वेंकटेशन यांनी मध्यंतरी केले होते. एमएसएमई क्षेत्र जागतिकदृष्ट्या स्पर्धाशील व्हावे, अशी अपेक्षा आहे. आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनातूनही एमएसएमईना महत्त्व आहे.

अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प सरकारने जशास तसे करवाढीला ९० दिवसांची स्थगिती दिली आहे. त्यानंतर स्थगिती उठवल्यास, त्याचा भारतास फटका बसू शकेल; परंतु त्याचवेळी चीनवर करांची कुर्हाड चालवल्यामुळे भारतास युरोप-अमेरिकेची मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. याचा अर्थातच मोठ्या उद्योगांसाठी पुरवठा साखळीचा भाग म्हणून काम करणार्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना फायदा होऊ शकेल. या बाबीचा विचार करून, केंद्र सरकारने एमएसएमई क्षेत्रासाठी निर्यातविकासाचे नवे धोरण निश्चित केले पाहिजे.

# हुकूमशाही आणि माणसा माणसांत भेद निर्माण करणारी संस्कृती हे लोकशाहीचे दोन प्रमुख शत्रू आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०२ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.



छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे,सर्वांनी प्रथम भारतीय व शेवटीही भारतीय ही भूमिका घ्यावी. करिता हुकूमशाही आणि माणसा माणसांत भेद निर्माण करणारी संस्कृती हे लोकशाहीचे दोन शत्रू आहेत. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दोन्ही विधानाच्या ८७ व्या व ७० व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर १०२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा ६ एप्रिल २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेनुसार विभाजनाला विरोध केला होता कारण त्या काळात ९८ लक्ष मराठी भाषिक, ३४ लक्ष गुजराती भाषिक व ३२ लक्ष कर्नाटकी लोक मागील ११५ वर्षापासून गुण्यागोविंदाने एकत्रित राहात होते. उलटपक्षी लोकसंख्येप्रमाणे गुजरातींना २७ तर कर्नाटकींना २१ जागा मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र अनुक्रमे ३१ व २८ जागेवर प्रतिनिधित्व बहाल करण्यात आले होते. तसेच अधिकाराच्या जागा वाटपात सुद्धा ९.३, ३.६ व ३.१ असे शेकडा प्रमाण असताना मात्र प्रत्यक्षात ६, ६ व ४ अशी विभागणी झाली होती. अर्थात मराठी भाषिकावर हा अन्याय होता. एवढे सर्व मिळाले असताना कर्नाटकाच्या विभाजनाची आवश्यकता नाही. असे बाबासाहेबाचे स्पष्ट मत होते.


प्रभावशाली नेतृत्व उपलब्ध नसेल तर सामूहिक शहाणपणाचे वैचारीक नेतृत्व स्विकारले पाहिजे. पब्लिक सेक्टरच्या माध्यमातून मिळालेल्या नौक–यातून अधिकाराचे विकेंद्रीकरण होऊन माणसाला प्रतिष्ठा प्राप्त होत होती. म्हणून ती नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खाजगीकरण केले जात आहे. समता स्थापित करण्यासाठी विषमता पाळणा–या संस्कृतीचा आपण नायनाट करून सभ्यता विकसित केली पाहिजे. जेणेकरून विविधतेत एकता व एकात्मता विकसित करताना प्रत्येक नागरिकांत मी प्रथमतः भारतीय व अंतिमतः सुद्धा भारतीय ही भावना दृढ करता आली तर एकसंघ अखंड भारताचे स्वप्न साकार होईल. करिता संस्कृती, विकृती आणि स्वीकृतीची चिकित्सा केली पाहिजे. सापनाथ व नागनाथ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. करिता आपण या प्रासंगिक विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास मंडळाचे राज्य समन्वयक प्रकाश सोनवणे म्हणाले की, वज्रीगणाप्रमाणे एकत्रित येऊन केलेल्या चर्चेतून सामूहिकरीत्या घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे. विषमतेचा नायनाट करण्यासाठी जातीव्यवस्था नष्ट करून समता व बंधूता वृद्धिंगत केली पाहिजे. जीवनात मिळविलेल्या ज्ञानाचे दान करीत राहिले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास मंडळाचे राज्य समन्वयक प्रमुख वक्ते प्रा. सुधीर कांबळे म्हणाले की, अशाप्रकारे दहा माणसे एकत्र येणे ही सुद्धा परिवर्तनाची नांदी आहे. कार्यकर्त्यांना उभी करणारी ही कार्यशाळा आहे. ज्यात सर्वांना आपली मते मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. चिकित्सक विचार हीच तथागत व बोधिसत्वाची देणगी आहे. तत्कालीन परिस्थितीत वर्ध्यातील पतीत पावन दास नांवाच्या व्यक्तींनी देव देवतांची होळी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकाच विषयावर दोन टोकाची विधाने पहायला मिळत असल्यास अंतिम विधान प्रमाण मानले पाहिजे. लग्नात वाढपी आपला असेल तर जेवण चांगले मिळण्याची शक्यता असते. आपण अनुयायी व्हावे की अंधभक्त हे आपणच ठरविले पाहिजे. हातात हात मिळवून बलशाली भारत घडविण्यासाठी प्रयत्न करुया.

याप्रसंगी अमित खिल्लारे म्हणाले की, वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेची छोटीशी चिन्गारी विचारांची मोठी ज्वाला होणार आहे. प्रतीक पंचशील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण आपल्यासाठी मार्गदर्शक आहे. नंतरच्या नेत्यांचे विचार या लिखाणाशी मेळ खात असेल तरच नेतृत्व स्विकारले पाहिजे. अशोक मेश्राम म्हणाले की, २०१४ नंतर देशात आपणांस हुकुमशाही पहायला मिळत आहे. माणसाच्या मृत्यूसमयी प्रेतयात्रेला जाणारी माणसे जीवंतपणी विचारत सुद्धा नसतात. ज्यामुळे माणसे परस्परांपासून विभक्त होत आहेत. महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला येथे धर्मांतराची घोषणा करून २० वर्षे हिंदूना सुधारण्याची संधी दिली होती. प्रस्थापित पक्षांत जाणाऱ्यांना केवळ नाममात्र पद दिले जाते पण पदावरील अधिकार दिले जात नाही. संतोष खरात म्हणाले की, मोबाईल मुळे मुले अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. शिक्षण, शिष्यवृत्ती, फेलोशिप बंद केल्या जात आहेत. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, मुंबई कौन्सिल मध्ये कर्नाटक, सिंध, महाराष्ट्र, गुजरात यांच्या भाषावार प्रांतरचनेनुसार विभाजनाचा प्रस्ताव पुढे आला त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कडाडून विरोध केला होता.

प्रास्ताविक करताना एड. विलास रामटेके म्हणाले की, बंद खोलीत चर्चा करून तयारीनिशी आपण मैदानात उतरले पाहिजे.







# डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत समता प्रस्थापित करणे काळाची गरज - डॉ. ह. नि . सोनकांबळे

छ.संभाजी नगर / प्रतिनिधी :- भारतीय समाजात आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे असे स्वप्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिले होते. असे प्रतिपादन डॉ.ह.नि. सोनकांबळे यांनी वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री.नितीन राठोड हे होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री. नितीनजी राठोड , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंदे,प्रा. विवेक थोरमोटे इ.उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संगीत विभागाचे प्रा. प्रविण बोबडे यांनी भीम गीत सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले ते म्हणाले की, बाबासाहेबांनी धर्म आणि जातीच्या पलीकडे जाऊन म. गौतम बुद्ध ,म. फुले आणि संत कबीर यांना आपले गुरु मानले या पैकी कोणीही बाबासाहेबाच्या जातीचे नव्हते,संसदेत हिंदू कोडबील मांडतांना संसद, श्रीमंत कुटुंबातील स्त्रीया आणि देशातील प्रस्थापितांचा विरोध पत्करला ;परंतु स्त्रीयांचे हक्क आणि अधिकार मिळवून देतांना माघार घेतली नाही, तसेच आरक्षणाची तरतूद करतांना सुध्दा पहिल्यांदा ओबीसी संवर्गासाठी तरतूद केली नंतर एस.सी/एस.टी.चा विचार केला, बाबासाहेबानी देशातील बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी, विकासासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.या सर्व घटकांनी बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्याची गरज आहे; परंतु असे होतांना दिसत नाही खंत व्यक्त केली. प्रमुख वक्ते डॉ. ह. नि . सोनकांबळे यांनी 'भारतीय संविधान- जबाबदारीचे आव्हान' या विषयावर आपले विचार व्यक्त केले






भारताचे संविधान लिहून पूर्ण झाल्यावर ते चांगल्या पद्धतीने राबवण्याची खरी जबादारी भारतीय नेतृत्वावर होती आज लोक उच्चशिक्षित असून नेते अल्पशिक्षित आहेत. बाबासाहेबांनी विवेकी समाजाचे स्वप्न पाहिले, जर जनता विवेकी असेल तरच लोकशाही टिकेल. संविधानाचे भविष्य नेतृत्वावर अवलंबून असते.आपल्याला सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करायला हवी ती जर झाली नाही तर लोकशाहीचा हा डोलारा जनता कधीही उध्वस्त करेल असा इशाराही बाबासाहेबानी दिला म्हणून त्यांनी सामाजिक समतेला आर्थिक समतेची जोड दिली बाबासाहेबांना शेतकऱ्यांच्या बिकट परिस्थितीची जाणीव होती . त्यांनी भारतातील शेतकऱ्यांसाठी घटनेत अनेक तरतुदी केल्या . शेतीला उद्योगाचा दर्जा द्यायला हवा असा आग्रह धरला. बाबासाहेबांचे देशापासून राष्ट्रनिर्मितीचे ध्येय साध्य करण्याचे आवाहन आपल्या समोर आहे.जातिव्यवस्थेच्या अंतानेच हे शक्य होईल असे प्रतिपादन सोनकांबळे यांनी केले. आजच्या काळात मूलभूत हकाचे संरक्षण होणे गरजेचे असून राजकीय समता टिकवण्याची जबाबदारी मतदारावर आहे हा महत्वाचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला . अध्यक्षीय समारोपात श्री. नितीनजी राठोड म्हणाले की, बाबासाहेब ज्ञानसूर्य होते . त्यांनी जाती धर्मापलीकडे जाऊन माणूसकीचा विचार केला. त्यांच्या सामाजिक विचारांचे अनुसरण करणे गरजेचचे आहे. बाबासाहेबांना अभिप्रेत स्वातंत्र्य ,समता,बंधुता सोबतच आपण मानवता जपली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . वसंत हरकळ यांनी तर आभार श्री.सुनील दहिफळे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# पाणी शुद्धीकरणासाठी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी



लातूर : प्रतिनिधी अद्यावत तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञांची मदत घेऊन पाण्याचे योग्य पद्धतीने शुद्धीकरण करून लातूर शहरात स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर महानगरपालिकेतील आढावा बैठकीदरम्यान केल्या आहेत. लातूर शहरात नळाद्वारे गढूळ आणि पिवळे पाणी वितरित होत असल्याच्या नागरिकाकडून येत असलेल्या तक्रारीची दखल घेऊन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि. १६ एप्रिल रोजी सकाळी खासदार डॉ.शिवाजी काळगे यांच्यासह महानगरपालिकेत जाऊन आयुक्त, उपायुक्त, नगर अभियंता, पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी यांची आढावा बैठक घेतली. सदरील आढावा बैठकीच्या प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक यासंदर्भात माहिती घेतल्यानंतर, पिवळे पाणी वितरित होण्याबाबतच्या कारणांची माहिती जाणून घेतली, धरणातील पाणी शेतीसाठी कॅनॉलद्वारे सोडल्यानंतर, पाण्यात मोठ्या हालचाली होऊन, शेवाळे वरच्या बाजूला येतात, या शेवाळ्यांचा तीव्र उन्हाशी संपर्क आल्यानंतर, शेवाळ्याचा रंग पाण्यात उतरत असल्याचे बैठकीदरम्यानसांगण्यात आले. पाण्याचा रंग पिवळा पडत असला तरी ते पिण्यास योग्य असल्याचा खुलासाही महापालिका प्रशासनाकडून यावेळी करण्यात आला. नळाला गढूळ आणि पिवळे पाणी येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यात तातडीने सुधारणा करावी, आवश्यक त्या तंत्रज्ञानाची उपलब्धता करावी, कोणत्याही परिस्थितीत यापुढे असे पाणी वितरित होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सक्त सूचना आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी संबंधितांना दिल्या आहेत. पिवळे पडत असलेले पाणी पिण्यास योग्य आहे असा महापालिका अधिका-यांचा दावा असला तरी, नागरिक हे पाणी पिण्यास धजावत नाहीत त्यामुळे सर्व प्रकारच्या उपयोजना करून स्वच्छ पाणीपुरवठा करावा असे निर्देश आमदार देशमुख यांनी यावेळी दिले. लातूर शहरातील खाजगी रुग्णालयाच्या उभारणीत आणि नंतर रुग्णालयांना परवाना देण्यात महापालिकेकडून येत असलेल्या अडचणी संदर्भात इंडियन मेडिकल असोसिएशनने दिलेल्या निवेदनासंदर्भात त्वरित कार्यवाही करावी, इतर महानगरातील नियमावली लक्षात घेऊन, समस्या सोडवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाचे कार्यवाही करावी, असे आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करण्याच्या यापूर्वीच सूचना दिल्या आहेत, हा आराखडा त्वरित तयार करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य दिव्य पुतळा बनवण्याची जबाबदारी महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्याकडे सोपवावी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याशेजारी उभारावा, हुतात्मा स्मारक, मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज वाचनालय, मिनी मार्केटमधील दुकानासाठी स्वतंत्र कॉम्प्लेक्स या व ईतर सर्व आवश्यक्य सोयी सुविधांसह हा विकास आराखडा तयार करण्यात यावा व त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी, अशी सूचनाही त्यांनी केली. नवीन रेणापूर नाका परिसरात नाल्याचे पाणी थांबून निर्माण होत असलेल्या अडचणींची सक्षम अधिका-याने जाऊन तातडीने पाहणी करावी आणि ती समस्या सोडवावी, नागरिकांच्या तक्रारीची तातडीने दखल घ्यावी, शहरात घंटागाडी कार्यक्षमतेने काम करील याची दक्षता घ्यावी, शहरातील विविध विकास योजनांची कामे दर्जेदार पद्धतीनेच व्हावीत, यात असंवैधानिक लोकांचा हस्तक्षेप खपवून घेऊ नये आदि सूचनाही या बैठकीदरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केल्या आहेत.

## सोनिया-राहुल गांधींवरील 'ईडी' कारवाईचा लातूर काँग्रेसतर्फे निषेध

लातूर : प्रतिनिधी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर 'ईडी' (अंमलबजावणी संचालनालय) मार्फत सुरु असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने दि. १७ एप्रिल रोजी जोरदार निदर्शने केली. काँग्रेस कार्यकर्त्यांनी या कारवाईला राजकीय सूडबुद्धी असल्याचे सांगत सरकारवर जोरदार टीका केली. केंद्रातील भाजपचे नरेंद्र मोदी सरकार काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर 'ईडी' चा दबाव आणून लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप यावेळी लातूर शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी केला. मोदी सरकारच्या हुकूमशाहीला काँग्रेसचा विरोध अस झाला आहे, म्हणूनच सोनिया-राहुल यांच्यासारख्या नेतृत्वावर 'ईडी'ची दडपशाही चालवली जात आहे. हा राजकीय वापर आहे आणि लोकशाहीवर हल्ला आहे, असेही ते म्हणाले. जनतेला हे जुलूम नक्कीच मान्य होणार नाही, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला. यावेळी अभय साळुंके, अमर खानापुरे, रविशंकर जाधव, सुभाष घोडके, कैलास कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, अजित माने, ॲड. देविदास बोरुळे पाटील, आयुब मणियार, भाऊसाहेब भडीकर, बिभीषण सांगवीकर, आसिफ बागवान, यशपाल कांबळे, राहुल डूमणे, निलेश देशमुख, ॲड. बाबा पठाण, शेख कलीम, खाजपाशा शेख, अभिजित इगे, युनूस शेख, फारूक शेख, पवनकुमार गायकवाड, सचिन कोतवाड, सिकंदर पटेल, सुपर्ण जगताप, तबरेज तांबोळी, ॲड. सुनीत खंडागळे, विष्णुदास धायगुडे, बालाजी झिपरे, सलीम तांबोळी, पिराजी साठे, धनराज गायकवाड, रिजवान देशमुख, इब्राहिम शेख, अमोल गायकवाड, अनिल शेळके, सोमनाथ तोटाळे, अशोक पोतदार, गोविंद शिंदे, महेश पवार, करीम तांबोळी यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे क्रांतिकारी शेतकरी संघटनेतर्फे अभिष्टचिंतन

लातूर : प्रतिनिधी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने दि. १७ एप्रिल रोजी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची आशियाना निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, राजेंद्र मोरे, सत्तार पटेल, अरुण कुलकर्णी, प्रज्योत हुडे, अशोक दहिफळे, प्रताप पाटील, नवनाथ शिंदे, नाना पाटवदकर, संपत गायकवाड, अर्चना माने, रुकसाना पटेल, संघर्ष दिव्यांग संस्थेचे शंकर सर्जे, पूजा सर्जे, सुमनताई कांबळे, सुरेखा आयवळे, मारुती कसबे, सावन गवळी, सचिन कसबे, प्रवीण गायकवाड आदी जण उपस्थित होते.




माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी शेतक-यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणली. आज त्यांच्या अमृत महोत्सवी जन्मदिनाचे औचित्य साधून मांजरा परिवारातील साखर कारखान्यानी ३ हजार रुपये भाव देत अनोखी भेट देताना शेतक-यांच्या खात्यात रक्कम जमा केल्याने शेतक-यांत आनंद ओसंडून वाहत आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांचे हीत हेच दिलीपराव देशमुख यांचे अंतिम ध्येय असल्यामुळे ख-या अर्थाने ते चळवळीचे वास्तवरुपी अव्यक्त आधारवड आहेत, असे यावेळी बोलताना राजीव कसबे यांनी सांगीतले.

# मंजूर कबालनामे तातडीने वाटप करावे यासाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर नागरिकांचा ठिय्या

अहमदपूर :- गेल्या अनेक वर्षापासून अहमदपूर स.नं.४ मधील शासनाने मंजूर केलेले कबालनामे प्रशासनाच्या हलगर्जी पणा मूळे गेल्या दोन महिन्यांपासून वाटप करण्यास टाळाटाळ करत असल्याच्या निषेधार्थ येथील सर्व लाभार्थ्यांनी मोर्चा रूपात येऊन उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर ठिय्या आंदोलन केले आहे. येथील सम्राट मित्र मंडळाच्या वतीने डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली सदरचे अंदोलन करण्यात आले. सूरूवातीला मौलाली नगर येथून लाभार्थ्यांचा मोर्चा येथील उपविभागीय कार्यालयावर धडकला. त्यानंतर नागरिकांनी प्रचंड घोषणाबाजी करत धरणे निदर्शने केले.येथेच सभेचे रूपांतर करण्यात आले. या प्रसंगी माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे, अण्णाराव सूर्यवंशी, भगवानराव ससाणे, दयानंदराव वाघमारे,मन्नानभाई शेख,रहीमभाई शेख,शेखूभाई शेख,हाजी शेख आदींची समयोचित भाषणे झाली. त्या नंतर प्रशासनाकडून कबालनामे वाटपाच्या संबंधाने कूठेलेच ठोस उत्तर येत नसल्याने नाविलाजाने सर्व लाभार्थ्यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायर्यांवर बसून ठिय्या अंदोलनास सूरूवात केली. या प्रसंगी शेख शादूल,शेख बशीर,पठाण जावेद,शेख नजमाबी,शेख लाला,शेख फरिद अहमद,पठाण शाहरूख,इरफान पठाण,शेख तोहीद,शेख हकीमभाई,शेख तूराब,युवराज गायकवाड,शेख मालनबी,चंद्रभागा मोरे,शेख छोटीबी, शेख कलीम, वृदांवन शिंदे आदीं सह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.






# देवेंद्र फडणवीस यांना कोर्टाकडून आली नोटीस

नागपूर : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गुरुवारी भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून २०२४ मध्ये झालेल्या विजयाला आव्हान देणाऱ्या निवडणूक याचिकेत नोटीस बजावली आहे. काँग्रेसचे प्रफुल्ल विनोदराव गुडधे यांनी निवडणूक याचिका दाखल केली होती, ज्यांचा फडणवीस यांच्याकडून ३९,७१० मतांच्या फरकाने पराभव झाला होता. याचिकेत गुडधे यांनी प्रक्रियात्मक त्रुटी आणि भ्रष्ट पद्धतींचा आरोप केला होता आणि उच्च न्यायालयाने फडणवीस यांचा विजय अवैध घोषित करावा अशी मागणी केली होती. गुडधे यांचे वकील पवन दहट म्हणाले, न्यायाधीश प्रवीण पाटील यांच्या खंडपीठाने मुख्यमंत्री फडणवीस यांना ८ मे रोजी उत्तर देण्यासाठी समन्स बजावले आहे. गुडधे यांचे वकील दहत आणि एबी मून यांनी दावा केला की गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत अनेक अनिवार्य तरतुदींचे पालन करण्यात आले नव्हते. दरम्यान, महायुतीने २८८ सदस्यांच्या विधानसभेत २३० जागा जिंकून विधानसभा निवडणुकीत मोठा विजय मिळवला होता. त्यानंतर फडणवीस मुख्यमंत्री झाले. दरम्यान, उच्च न्यायालयाने नागपूर पश्चिम येथील भाजप आमदार मोहन मते आणि चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर मतदारसंघातील कीर्तीकुमार भांगडिया यांनाही अशाच प्रकारच्या निवडणूक याचिकांवर समन्स बजावले आहेत.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी अटक. पोलीस स्टेशन विवेकानंद चौक लातूर पोलिसांची कारवाई.

लातूर :- घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीकडून अंदाजे २ तोले सोने, चांदी आणि रक्कम असा ०१ लाख १० हजार रुपयाच्या मुद्देमालासह दोन आरोपी अटक. घरफोडीचे चार गुन्हे उघडकीस आले पोलीस स्टेशन विवेकानंद चौक लातूर पोलिसांची कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसांपूर्वी रात्रीच्यावेळी विवेकानंद चौक पोस्टे हद्दीतील परिसरात घरचा कडीकोंडा तोडून आत मध्ये प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिन्याची चोरी केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता .

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, रणजीत सावंत पोलिस उपअधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर यांचे मार्गदर्शनात विवेकानंद चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात विवेकानंद चौक पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना सदरच्या पथकाला नमूद घराचे कडे कोंडा तोडून चोरी करणाऱ्या आरोपीची गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली.माहितीची खातरजमा करून पथकाने महाडा येथे दोन आरोपींना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव

सुशांत शिवाजी गायकवाड, वय २६ वर्ष, राहणार महाडा कॉलनी लातूर,

कृष्णा ऊर्फ किरया गुंडेराव लोंढे वय २२ वर्ष राहणार म्हाडा कॉलनी लातूर.

असे असल्याचे सांगितले. त्यांना आम्हीअधिक विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी महाडा कॉलनी लातूर येथे वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी घराचा कुलूप कोंडा तोडून सदरचे घरामध्ये चोरी केल्याचे सांगितले व सदरचा चोरी केलेला मुद्देमाल हा सुशांत शिवाजी गायकवाड याचे घरात लपून ठेवला असल्याचे सांगितल्याने सदर आरोपीचे घरातून त्यांनी चोरी केलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख १० हजार मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.




सदरचा मुद्देमाल हा पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथील चार घरफोडीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेल्या मुद्देमालासह ताब्यात घेऊन पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक करीत आहे

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, रणजीत सावंत पोलिस उपअधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन विवेकानंद चौक चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक पंकज शिनगारे ,पोलीस अमलदार खुरम काझी ,यशपाल कांबळे, गणेश यादव, रवी गोंदकर, रणवीर देशमुख, आनंद हल्लाले, संजय बेरळीकर, महारुद्र डिगे , रमेश नामदास,अनिता सातपुते,दीपक बोन्दर यांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE